देशोन्नती

# सायन्स कॉलेजमध्ये सायबर क्राईम विषयावर पथनाट्यच्या माध्यमातून जनजागृती

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ सायन्स कॉलेज आणि क्लिक हिल फाउंडेशन व नांदेड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर क्राईमविषयी जनजागृती मोहीमेअंतर्गत ६ एप्रिल रोजी पथनाट्य सादर करून महाविद्यालयात जनजागृती करण्यात आली. आधार सामाजिक संस्थाचे सुनील नलवडे आणि त्यांची टीम व नांदेड सायबर सेलचे काशिनाथ कारखेडे कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



आजच्या काळामध्ये इंटरनेट वापरत असताना आपण किती सुरक्षित आहोत आणि आपल्याला कशा प्रकारच्या समस्या उद्‌भवतात, त्यामध्ये अनोळखी लोकांचे फ्रेंड रिक्वेस्ट येणे, आपली वैयक्तिक माहिती सोशल मीडियावर टाकताना कशा प्रकारची काळजी घ्यावी, फ्री ॲप डाऊनलोड करताना त्याची माहिती जाणून घेणे, सोशल मीडियावर दुसऱ्यांच्या नावे अकॉउंट उघडले जातात, सोशल मीडियावर अश्लील कमेंट केली जाते, अशा अनेक समस्या आपल्याला जाणवतात, त्यापासून आपला कसा बचाव करावा व सावधगिरी बाळगावी, याबद्दल पथनाट्य टीमने सुंदर असे पथनाट्य सादरीकरण केले आणि या पथनाट्याच्या माध्यमातून महाविद्यालयात जनजागृती करण्यात आली. उपक्रम उत्स्फूर्तपणे महाविद्यालयात राबविला गेला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. डी. यु. गवई, उपप्राचार्य व रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रो. डॉ. अरुणा राजेंद्र शुक्ला, प्रो. डॉ. ए. एस. बनसोडे, डॉ. किरण शिल्लेवार, डॉ. भगुरे, प्रा. एस. एफ. गोरे, प्रो.डॉ. प्रीता बोरकर, डॉ. रेखा वाडेकर सहभागी झाले होते.